845

(११)

**शासनाच्या विविध प्रकल्पांसाठी आदिवासी खातेदारांच्या जमिनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ चे कलम ३६ व ३६-अ अन्वये खरेदीने/ वाटाघाटीने संपादन करण्यास परवानगी देणे, नजराणा १० टक्के आकारणेबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-आदिवासी-३१०९/११८०/प्र.क्र.१०६/ल-९.**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक-१५ जुलै,२०१०.**

संदर्भ- १) शासनाचे परिपत्रक क्र.महसूल व वन विभाग क्र.एलक्यूएन-१८/२००४/प्र.क्र. १६२/अ-२, दिनांक ६.६.२००६

२) शासन पत्र क्र.आरपीए-०१०९/प्र.क्र.५४/र-१, दिनांक २.७.२००९.

३) जिल्हाधिकारी, नंदूरबार यांचे क्र.टेनन्सी/का/कक्ष/कावि-८०६/०९, दिनांक ११.११.२००९.

## शासन निर्णय

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ चे कलम ३६ व ३६-अ अन्वये आदिवासी खातेदारांच्या जमिनीच्या हरतांतरणास निर्बंध घालण्यात आले आहेत. सदर अधिनियमाच्या कलम ३६-अ नुसार आदिवासी खातेदारांच्या जमिनी बिगर आदिवासी खातेदारास हस्तांतर करण्यास शासन स्तरावरून परवानगी दिली जाते. राज्य शासनाच्या विविध प्रकल्पांसाठी संबंधीत विभागाकडून आदिवासी खातेदारांच्या जमिनी खाजगी वाटाघाटीने शासनाच्या प्रचलित नियमानुसार शिघ्रसिध्द गणकानुसार येणाऱ्या मुल्यांकनास खरेदीने संपादन करण्यास परवानगी देण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर होत असतात. आदिवासी खातेदाराच्या जमिनी बिगर आदिवासीकडे हस्तांतर करण्यासंदर्भातील प्रस्ताव विभागीय आयुक्तांमार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडून सादर केले जातात. आदिवासी खातेदारांच्या जमिनीच्या हस्तांतरणास निर्बंध असले तरी शासनाच्या प्रकल्पासाठी जमीन आवश्यक असल्याने सर्वाधिक मुल्यांकनास व जमिनीच्या सत्ता प्रकारानुसार व निर्बंधानुसार आवश्यक ती अनर्जित रक्कम/ नजराणा रक्कम भरणा करून घेऊन हस्तांतरणास परवानगी दिली जाते.

२. शासकीय प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जमीन खाजगी वाटाघाटीने / खरेदीने संपादन करण्यास संदर्भित क्र.१ वरील दिनांक ६.६.२००६ च्या परिपत्रकान्वये आदेश देण्यात आलेले आहेत. ज्यावेळी शासकीय प्रकल्पासाठी जमीन संपादित होत असते, तेव्हा आदिवासी खातेदार स्वतःहून त्यांची जमीन हस्तांतरीत करीत नाहीत. अशा प्रकरणी शासन स्वतःच जमीन संपादित करीत असल्यामुळे पुन्हा शासनानेच त्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ व ३६अ नुसार पूर्वपरवानगी देण्याची आवश्यकता नाही, तसेच त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या वेगळ्या परवानगीची देखिल आवश्यकता नाही. जिल्हाधिकाऱ्यांची भूमिका केवळ संबंधित आदिवासी खातेदारास जास्तीत जास्त मोबदला मिळवून देण्यापुरती मर्यादित असावी. जेणेकरून प्रकल्प उभारणीमध्ये विलंब होणार नाही. या दृष्टीकोनातून पुनर्वसन कक्षाच्या संदर्भित क्र.२ वरील दिनांक २.७.२००९ अन्वये निर्गमित केलेल्या

जमिनीच्या बाबतीत ५० टक्के नजराणा आकारण्याऐवजी जमिनीच्या किंमतीच्या १० टक्के अनर्जित रक्कम म्हणून मोबदला रकमेतून कपात करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्याच धर्तीवर आदिवासी खातेदाराच्या जमिनी संबंधीत शासकीय विभागास शासनाच्या प्रकल्पासाठी हस्तांतरीत करताना जमिनीच्या विविध मार्गाने येणाऱ्या मुल्यांकनापैकी (शिघ्रसिध्द गणकानुसार येणारे मुल्यांकन, खरेदी विक्री तक्त्यानुसार येणारे मुल्यांकन, पंचनाम्यानुसार येणारे मुल्यांकन तसेच खाजगी वाटाघाटीमधून निश्चित होणारे मुल्यांकन) सर्वाधिक मुल्यांकन जिल्हाधिकारी यांनी निश्चित करावे व आदिवासी खातेदाराच्या जमिनीची सर्वाधीक किंमत आदिवासी खातेदाराच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून त्यामध्ये धनादेशाव्दारे अदा झाल्याची खात्री संबंधीत तहसिलदाराने करावी. तसेच जमिनीच्या सत्ता प्रकारानुसार व निर्बंधानुसार शासनाच्या प्रकल्पासाठी अशा जमिनी संपादित होत असल्यामुळे अशा जमिनीच्या प्रचलित बाजारमूल्याच्या १० टक्के इतकी रक्कम अनर्जित रक्कम वा नजराणा रक्कम म्हणून शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात यावी. अशा प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांची अनुमती केवळ जमिनीची किंमत निश्चित करण्यापुरती राहील, या अटी शर्तीनुसार व जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अन्य अटी शर्तीच्या अधीनतेने शासकीय प्रकल्पासाठी आदिवासी खातेदारांच्या जमिनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ३६ व ३६अ नुसार खाजगी वाटाघाटीने/खरेदीने, संपादन / हस्तांतर करण्यासंदर्भात पुढील आवश्यक ती कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी.

आदिवासी जमिनी १० % नजराणा

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक 201007161423130001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ता. मा. कोळेकर )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रतिलिपी-

सर्व विभागीय आयुक्त,

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी.
सर्व विशेष भूसंपादन अधिकारी.
महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने.

H 1576-1 85